International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# महिलांचे (लोकसभा व राज्य विधानसभा) आरक्षण विधेयक: एक आढावा

**डॉ. सुजाता सा. पाटील**

*देवचंद कॉलेज, अर्जुननगर*

*Corresponding Author - डॉ. सुजाता सा. पाटील*

DOI - 10.5281/zenodo.12718607

**प्रस्तावना:**

एकेकाळी भारतात मातृसत्ताक पद्धती होती. आर्यांच्या आक्रमणानंतर पुरुषप्रधान संस्कृतीमुळे लिंगभेदावर आधारित संस्कृती आणि संस्कारांमुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित झाले. नीती, त्याग, पावित्र्य, सहनशीलता, कुलिनता अशा गुणांचा मक्ता स्त्रियांकडे देण्यात आला. त्याचा परिणाम म्हणजे स्त्रियांचे दास्यत्व, परावलंबी वृत्ती, निर्णयात कमकुवतपणा, वैचारिक गुलामगिरी, व्रतवैकल्यांचा पगडा हा अधिक घट्ट होत गेला आणि समाजातील स्त्रियांचे सर्व क्षेत्रातील स्थान संकुचित बनत गेले. काळाच्या ओघात परिस्थितीत बदल होऊ लागले. अठराव्या शतकात स्त्रियांची परिस्थिती सुधारण्याची गरज काही समाजसुधारकांना जाणवू लागली. राजा राममोहन रॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे इत्यादी उदारमतवादी दृष्टीकोण असलेल्या समाजसुधारकांच्या प्रयत्नाने आणि प्रेरणेने स्त्री स्वातंत्र्य युगाचा प्रारंभ झाला. राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधान निर्माण झाले. स्त्री विषयक कायदे आणि त्यांच्या संरक्षणाविषयीची तरतूद घटनेत करण्यात आली. भारतीय महिला शिक्षित होऊ लागल्या. देशाची आर्थिक व्यवस्था मजबूत करण्यात त्यांचा सहभाग होऊ लागला.भारतीय महिला सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटवू लागल्या. असे असले तरी आजही भारतीय महिला स्वतःच्या अस्तित्वासाठी व हक्कासाठी संघर्ष करताना आढळतात.1 सामाजिक क्षेत्रात स्त्रियांचे स्थान हे सुधारू लागले तरी तिच्या संरक्षणाचा प्रश्न हा आहेच. स्त्रियांचा भारतीय राजकिय व्यवस्थेतील सहभाग हा दुय्यमच दिसतो. लोकसभा, विधानसभेतील महिला सदस्यांची टक्केवारी अत्यल्प असलेली दिसते. महिलांच्या राजकीय सहभागाविषयीच्या या निराशाजनक परिस्थितीचा आढावा घेण्याच्या उद्देशाने सदरचा संशोधन पेपर करण्यात आलेला आहे.

**स्त्रियांचा राजकीय सहभाग:**

1951 ला जेव्हा पहिली लोकसभा झाली तेव्हा महिला सदस्यांचे प्रमाण 05 % होते. त्यानंतर

दुसऱ्या लोकसभेपासून चौदाव्या लोकसभेपर्यंत हे प्रमाण 06 ते 09% पर्यंत होते. पंधराव्या लोकसभेत 11%, 16 व्या लोकसभेत 12% आणि आता 17 व्या लोकसभेत तेच टक्केवारीचे प्रमाण 14% झालेले आढळते. जगातील सर्व राष्ट्रांमधील महिलांच्या राजकीय सहभागातील यादीत 142 व्या क्रमांकावर भारत आहे.महिलांचा हा सहभाग वाढावा म्हणून 33% आरक्षणाचा मुद्दा अनेक वर्षे संसदेत फक्त चर्चेपुरताच आणला गेला. 73 व्या आणि 74 व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांसाठी जागा राखीव ठेवल्या. अनुसूचित जाती, जमाती यांच्यासाठी लोकसभा आणि विधानसभेतील जागा राखून ठेवण्याची तरतूद संविधानात असली तरी महिलांसाठी लोकसभा आणि राज्य विधानसभेतील आरक्षणाची तरतूद संविधानात नाही. बऱ्याच वेळेला महिला राखीव जागा ठेवण्यास विरोध झालेला दिसतो. सतराव्या लोकसभेच्या एकूण सदस्यांपैकी 15 टक्के महिला आहेत तर राज्यांच्या विधानसभांमध्ये साधारणपणे एकूण सदस्यांपैकी नऊ टक्के महिला आहे. याचाच अर्थ भारतातील महिलांच्या विधानसभा आणि संसदेतील प्रतिनिधित्वाची टक्केवारी निराशाजनक आहे.

**महिला आरक्षण विधेयकाचा इतिहास:**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना एकत्रित आरक्षण देण्यासाठी मे 1989 ला घटनादुरुस्ती विधेयक मांडून महिला आरक्षणाचा प्रश्न सर्वप्रथम ऐरणीवर आणला. लोकसभेत हे विधेयक मंजूर झाले मात्र राज्यसभेत मंजूर झाले नाही. 1992 आणि 93 मध्ये 72 आणि 73 हे घटनादुरुस्ती विधेयक पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी पुन्हा सादर केले. यात सर्व जागांपैकी एक तृतीयांश जागा आणि महिलांसाठी ग्रामीण शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेत अध्यक्षपदे राखीव होती. दोन्ही सभागृहांनी हे विधेयक मंजूर केले आणि कायदा निर्माण झाला. देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्थेत आज महिला प्रतिनिधी आहेत.

1996,1998, 1999 व 2008 मध्ये महिलांच्या राज्य विधानसभा आणि संसदेत राखीव जागा संदर्भात घटना दुरुस्ती करणारी विधेयके मांडण्यात आली. पहिली तीन विधेयके त्यांच्या संबंधित लोकसभा विसर्जित झाल्यामुळे रद्द झाली. 2008 मधील विधेयक राज्यसभेत सादर करण्यात आले व मंजूर करण्यातही आले मात्र चौदाव्या लोकसभेच्या विसर्जनामुळे तेही रद्द झाले. 2015 मधील भारतातील महिलांच्या स्थिती वरील अहवालात असे नमूद करण्यात आले की राजकीय पक्षांमध्ये निर्णय घेण्याच्या पदांवरती महिलांची उपस्थिती अत्यल्प आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य विधानसभा, संसद, मंत्रीपद आणि सरकारच्या सर्व निर्णय घेणाऱ्या संस्थांमध्ये महिलांसाठी किमान 50 टक्के जागा राखीव ठेवण्याची शिफारस करण्यात आली. त्यानंतर 19 सप्टेंबर 2023 रोजी विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले. या विधेयकाचा प्रयत्न म्हणजे लोकसभा आणि राज्य

विधानसभेतील एकूण जागांपैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीवअसाव्यात असे होते.

संविधानाच्या (128 वी सुधारणा) विधेयक 2023 लोकसभा आणि राज्यसभेतून एकमताने मंजूर झाले यात लोकसभा आणि राज्य विधानसभेच्या एकूण जागांपैकी एक तृतीयांश जागा महिला राखीव ठेवण्यासाठी प्रयत्न झाला आहे. या विधेयकातील काही तरतुदी म्हणजे

1) महिलांसाठी राखीव जागा राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशातील वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये आवर्तनाद्वारे वाटप केल्या जाऊ शकतील.
2) अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव असलेल्या जागांमध्ये, महिलांसाठीच्या आरक्षित जागांपैकी एक तृतीयांश जागा आवर्तन तत्वावर देणे.
3) प्रत्येक राज्य विधानसभेत महिलांसाठी जागांचे शिवाय एससी आणि एसटी साठी राखीव असलेल्या जागांपैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी देणे, आरक्षण अनिवार्य करणे.
4) आरक्षणाची सुरुवात हे विधेयक प्रकाशित झाल्यानंतर झालेल्या जनगणनेनंतर लागू होईलजनगणनेच्या आधारे महिलांसाठी . राखीव जागांसाठी सीमांकन हाती घेण्यात .येईल
5) हे आरक्षण 15 वर्षांच्या कालावधीसाठी दिले जाईल.
6) संसदेने बनवलेल्या कायद्यानुसार प्रत्येक सीमांकनानंतर महिलांसाठी राखीव जागा फिरवल्या जातील.

अशा प्रकारच्या काही तरतुदी या 2023 मध्ये झालेल्या महिला आरक्षण विधेयकात करण्यात आलेले आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत केलेल्या भाषणात येणाऱ्या 2024 च्या निवडणुकीत आरक्षण लागू होणार नसल्याचे निर्देश दिले. लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना आरक्षण देण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी सरकार पुढील लोकसभा निवडणुकीनंतर जनगणना आणि सीमांकन व्यायाम करेल. तर कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी हे विधेयक मांडताना म्हटले की ही घटनादुरुस्ती क्षैतीज आणि उभी आहे. एससी आणि एसटी महिलांसाठीही आरक्षण आहे कारण जनगणना आवश्यक आहे आणि सीमांकन आवश्यक आहे. परिसिमन कमिशन नंतर महिलांना कोणती जागा द्यायची हे ठरवेल. सध्या असलेल्या कायद्याच्या अंतर्गत सीमांकन आयोगाचे नेतृत्व सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश करतात आणि जनगणनेच्या माहितीचे विश्लेषण करण्याचे काम करतात. आयोगाने जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे नवीन लोकसभा मतदारसंघाचे सीमांकन करणे अपेक्षित आहे. जनगणनेच्या आकडेवारीनुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी मतदारसंघ राखीव आहेत. संसदेने एकदा परिसिमन कायदा लागू केल्यास केंद्र

सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाच्या अध्यक्षतेखाली परिसिमन आयोग स्थापन करते. या उच्च अधिकार असलेल्या संस्थेचे आदेश कायदेशीर रित्या बंधनकारक आहेत आणि कोणत्याही न्यायालयाच्या छाननीच्या अधीन नाहीत. मुख्य निवडणूक आयुक्त किंवा दोन निवडणूक आयुक्तांपैकी कोणत्याही आयोगाची स्थापना करणाऱ्या आयोगाने जारी केलेल्या आदेशात संसद देखील बदल सुचवू शकत नाही. जर हा व्यायाम विशेषतः एखाद्या राज्यासाठी असेल, तर त्या राज्याच्या निवडणूक आयुक्त देखील आयोगाचा सदस्य असतो. राष्ट्रपतींनी निर्दिष्ट केलेल्या तारखेपासून आयोगाची शिफारस लागू होते. त्याच्या आदेशाच्या प्रती संबंधित लोकसभा आणि विधानसभेसमोर ठेवल्या जातात मात्र कोणत्याही बदलांना परवानगी दिली जात नाही. अशा प्रकारचे स्वरूप सीमांकन व्यायामाचे आहे. आतापर्यंत 1952,1963, 1973 आणि 2002 मध्ये केलेल्या परिसिमन सरावांमध्ये मतदारसंघातील महिलांची नेमकी संख्या ही विचारात घेण्यात आली नाही. आसाम अरुणाचल प्रदेश नागालँड मणिपूर साठी 2001 च्या जनगणनेनंतरही सीमांकन व्यायाम 2002 आयोगाने सोडला होता. मार्च 2020 ते 2022 या दोन वर्षाहून अधिक काळ जम्मू आणि काश्मीरच्या नव्याने तयार केलेल्या केंद्रशासित प्रदेशासाठी सीमांकन सराव चालला. 2022 मध्ये आसाममध्ये निवडणूक आयोगाने सीमांकन सराव सुरू केला आणि अंतिम मसुदा ऑगस्ट 2023 मध्ये प्रकाशित करण्यात आला. मात्र या प्रक्रियेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. वरिष्ठ अधिवक्ता गोपाल शंकर नारायण यांनी विधेयकातील सीमांकन आवश्यकतेला रेड हॅरी आणि महिला आरक्षणाच्या मुद्द्याला वोट सेवा देण्याचा मार्ग म्हटले आहे. शंकर नारायण म्हणतात परीसिमन आणि जनगणना या दोन्ही गोष्टींचा महिला आरक्षणाशी पूर्णपणे संबंध नाही.[2].

महिला आरक्षणाच्या बाबतीत वरील प्रकारच्या अनेक तरतुदी व प्रक्रिया आढळून येत असल्या तरी प्रत्यक्षात महिला आरक्षण धोरण अस्तित्वात येणे अतिशय आवश्यक आहे. महिलांच्या राजकीय याची नितांत गरज आहे. सध्याचे महाराष्ट्रातील उदाहरण पाहिले तर लक्षात येते की 2023 च्या सरकारात एकही महिला मंत्री नाही.महिला आणि बालविकास या सारखे खातेही विधानसभा महिला सदस्याला देण्यात आले नाही. यातून हेच निष्कर्ष निघते की स्त्रियांचे राजकीय स्थान आजही दुय्यम असण्याचा हा प्रकार आहे. महिलांचे आरक्षण हे स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे. महिलांमध्ये त्यांचे हक्क आणि राजकारणातील त्यांच्या सहभागाचे महत्त्व याविषयी जाणीव जागृती निर्माण करणे गरजेचे आहे.राजकीय आणि सार्वजनिक जीवनातील महिलांवरील भेदभाव दूर करण्याचा प्रयत्न या आरक्षणाच्या माध्यमातून होईल असे वाटते. विविध स्तरांवरती राजकारणातील महिला आरक्षण हे महिलांना सक्षम करेल. केवळ राजकीय सहभाग नव्हे तर अनेक क्षेत्रात नेतृत्व करण्यासाठी

सुद्धा प्रेरणा मिळेल. स्त्रियांचा आरक्षणाच्या माध्यमातून राजकीय सहभाग वाढला की स्त्रियांशी संबंधित असणारे शिक्षणविषयक, आर्थिक सक्षमीकरणविषयक, महिलांचे आरोग्य असो किंवा लिंग आधारित हिंसा असो अशा अनेक प्रश्नांवरती धोरणात्मक चर्चांमध्ये हे मुद्दे प्रामुख्याने हाताळले जाऊ शकतात.

**संदर्भ** :


1. अनंतराम शरयू वंडसे उमा :स्त्रियांचे स्थान,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई.पहिली आवृत्ती 1987
2. http://www.indiatoday.in/law/story womens-reservation bill-delimitation-exarcise-census-triple-test-2438856-2023-99-22
3. http://www.livemint.com/news/India/pm-narendra-modi-presents-national-creators-award-2024